Public Affairs Office
U.S. Consulate General, Mumbai

PRESS RELEASE

AMERICAN CENTER, 4 New Marine Lines, Mumbai 400 020
Tel: 91-22-2262-4590 Fax: 91-22-2262-6800
E-mail: MumbaiPublicAffairs@state.gov Web: http://mumbai.usconsulate.gov

ऑगस्ट १८, २००८

"बिल्डिंग इस्लाम इन डेट्रॉईट" प्रदर्शनाचे औरंगाबादयेथे उद्घाटन

औरंगाबाद, "बिल्डिंग इस्लाम इन डेट्रॉईट" नामक छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे औरंगाबादयेथील मौलाना आझाद सोसायटीच्या कन्या महाविद्यालयात ऑगस्ट १८, २००८ रोजी उद्घाटन झाले. अमेरिकन सेंटर (मुंबई) तर्फे आयोजित हे प्रदर्शन २० ऑगस्ट पर्यंत सकाळी १० ते संध्याकाळी ६ दरम्यान लोकांसाठी खुले असेल. औरंगाबादआधी हे प्रदर्शन मुंबई-स्थित बुर्हानी महाविद्यालयात उभारले गेले.

"बिल्डिंग इस्लाम इन डेट्रॉईट" अमेरिकेचे सांस्कृतिक वैभव दर्शवण्याचा एक आगळा वेगळा प्रयास आहे. अनेक धर्म, इस्लाम सकट, अमेरिकेत नांदताना दिसतात व त्यामुळे अमेरिकेचे जनजीवन अधिक समृद्ध आहे. या प्रदर्शनात डेट्रॉईट शहरातील मुसलमानी वारसा असलेल्या विविध वास्तूंचा उत्तम आढावा घेतला आहे. स्थापत्यशास्त्रातील विविध नमूने डेट्रॉईटमधील इस्लामच्या प्रसारावर भाष्य करतात.

अमेरिकेतील डेट्रॉईट (मिशिगन स्टेट) मध्ये मुसलमान लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर फार पूर्वीपासून स्थिरावली आहेत. जगाच्या कानाकोपऱ्यातून अमेरिकेत स्थलांतरित झालेल्या मुसलमान नागरिकांनी १९२१ पासून आजपर्यंत, विविध आकार व प्रकारांच्या मशिदी येथे बांधल्या आहेत.